वाचले:

१. महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र. पीसीसी-२०२४/प्र.क्र.८९/नवि-२२ दिनांक १५ ऑक्टोंबर, २०२४
२. मा.प्रशासक यांजकडील मा.महापालिका सभा ठराव क्र. ७९९ दिनंक १०/१२/२०२४
३. सामान्य प्रशासन विभागाकडील दिनांक 03/02/२०२5 रोजीचा मान्य प्रस्ताव

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,<br>
सामान्य प्रशासन विभाग,<br>
क्र: सा.प्र.वि/०२/कावि/23/२०२5<br>
दिनांक : 04/02/२०२5

विषय : 'वाहतूक नियोजन विभाग' ऐवजी 'शहरी दळणवळण विभाग' असे संबोधनेबाबत....

आदेश,

ज्याअर्थी, क्र.पीसीसी-३०१९/प्र.क्र.३८१/नवि-२२.- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम — ४५६ (अ) व या अधिनियमातील लागू असलेल्या अन्य तरतुदीव्दारे मिळालेल्या शक्तींचा वापर करुन, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अंमलात असलेले सध्याचे सर्व सेवा प्रवेश नियम तसेच तत्संबंधात यापूर्वी करण्यात आलेले ठराव व आदेश यांचे अधिक्रमण करुन, महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम - ४५७(३) अंतर्गत महानगरपालिकेमधील विविध पदांवर करावयाच्या नियुक्त्यांचे नियमन व सेवांचे वर्गीकरण करण्यासाठी सुधारित नियमांना महाराष्ट्र शासन राजपत्र, दि.१८ फेब्रुवारी २०२० अधिसूचनेव्दारे 'पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२०' करिता मंजूरी दिलेली आहे.

आणि ज्याअर्थी, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील वाहतूक नियोजन विभागाच्या नावात बदल व वाहतूक नियोजन विभागासाठी नवीन पदनिर्मिती व सेवाप्रवेश नियमात बदल करण्याबाबत महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र. पीसीसी-२०२४/प्र.क्र.८९/नवि-२२ दिनांक १५ ऑक्टोंबर, २०२४ अन्वये मान्यता दिलेली आहे.

त्याअर्थी, मी आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका उक्त शासन मंजूर सेवाप्रवेश नियम तसेच मा.प्रशासक यांजकडील मा.महापालिका सभा ठराव क्र. ७९९ दिनांक १०/१२/२०२४ अन्वये प्राप्त मान्यता विचारात घेवून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या 'वाहतूक नियोजन विभाग' ऐवजी 'शहरी दळणवळण विभाग'(Urban Mobility Department) असे संबोधन्यास व तशी महानगरपालिका सर्व दप्तरी नोंद करण्यास प्रस्तुत आदेशान्वये मान्यता देत आहे. तसेच १ एप्रिल २०२५ पासून शहरी दळणवळण विभागाकरीता आवश्यक अर्थसंकल्पीय तरतुद स्वतंत्र दर्शविण्यात यावी त्याअनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.

प्रस्तुतच्या आदेशाचा अंमल तात्काळ लागू होईल.

(शेखर सिंह)<br>
आयुक्त,<br>
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,

प्रति, सर्व संबंधित विभाग

E:\desktop\mandhan gr\dhoran.docx